सत्यमेव जयते
जलसंपदा विभाग

# अधीक्षक अभियंता

**महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,**
**मेरी इमारत, दिंडोरी रोड, नाशिक -४२२००४**
**Phone No. : 0253-2531153**
**Email:semeri.nashikwrd@maharashtra.gov.in, semerinashik@gmail.com**
**Web : www.merinashik.org**

जा.क्र.मअसंसं/ १६८०/ आ-४/२०२१ दि.२५/१०/२०२१

प्रति,
कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन,कोथरूड ,पुणे - ४२२०३८.

**विषय :** **शासकीय निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवाकरार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.**

**संदर्भ :** मा.महासंचालक यांचे दिनांक २२/१०/२०२१ मंजूरी कार्यालीन टिप्पणी.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन विभाग,मेरी,नाशिक या कार्यालयाकरिता जलसंपदा विभागातून सेवा निवृत्त झालेले गट -ब (अराजपत्रित ) कनिष्ठ अभियंता /शाखा अभियंता यांचे मधुन भरावयाची आहेत.

सोबत जलसंपदा विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावयाची जाहिरातीची पीडीएफ फाईल तयार करून ई-मेलव्दारे पाठविण्यात येत आहे.तरी सदरची जाहिरात जलसंपदा विभागाचे वेबसाईटवर दिनांक ३०/१०/२०२१ पुर्वी प्रसिध्द करण्यात यावी.

हे आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

सोबत : प्रसिध्दीचा मसुदा -२ प्रतीत

( गि. म. संघाणी )
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
नाशिक ४२२ ००४

**प्रत :** मा. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, मेरी वसाहत,नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत :** कार्यकारी अभियंता,स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग,मेरी,नाशिक - 422004 यांना पुढिल कार्यवाहिसाठी रवाना.

सत्यमेव जयते
जलसंपदा विभाग

# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग
# अधीक्षक अभियंता
**महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,**
**दिंडोरी रोड, नाशिक -४२२००४ Phone No. : 0253-2531153**
**Email:semeri.nashikwrd@maharashtra.gov.in, semerinashik@gmail.com**
**Web : www.merinashik.org**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित करणेबाबत

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५ /प्र. क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६. मधील तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,मेरी, नाशिक या कार्यालयात खालीलप्रमाणे पदे जलसंपदा विभागातून सेवानिवृत्त झालेल्या गट -ब अराजपत्रित अधिकाऱ्यांमधून सेवाकरार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | जिल्हा | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता | नाशिक | ५ | अंतिम वेतन वजा पेन्शन सुत्राप्रमाणे |
| | पात्रता अनुभव :- बांधकाम कार्यप्रकारातील कामाचा अनुभव असलेले जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त गट - ब अराजपत्रित अधिकारी | | | |

१. करारपध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त गट -ब अराजपत्रित अधिकारी यांना शासन सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई - ३२ शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक २७/१२/२०१६ मधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

२. नियुक्तअधिकाऱ्यांना अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,मेरी, नाशिक या कार्यालयांतर्गत विभागात प्रकल्पीय स्थापत्य कामाच्या अनुषंगाने विविध तांत्रिक स्वरूपची कामे करावी लागतील.

३. सदर नेमणुकी संदर्भातील लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई - जलसेवा https://wrd.maharashtra.gov.in या वेबसाईट मध्ये उपलब्ध आहे. तसेच नमुना अर्ज तसेच अटी व शर्ती अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,मेरी, नाशिक या कार्यालयात उपलब्ध आहे.

४. विहित नमुन्यातील कोरे अर्ज कार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग,मेरी,नाशिक. दुरध्वनी क्रमांक०२५३-२५३०६७० यांचे कार्यालयातून दिनांक ३०/१०/२०२१ ते १५/११/२०२१ पर्यंत प्राप्त करून घेता येतील.तसेच भरलेले अर्ज कार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग,मेरी,नाशिक. दुरध्वनी क्रमांक०२५३-२५३०६७० यांचेकडे दिनांक ३०/१०/२०२१ ते १५/११/२०२१ रोजी (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ) पोहोच होतील याप्रमाणे प्रत्यक्ष किंवा पोष्टाने सादर करावेत. अर्जाचे पाकिटावर कनिष्ठ अभियंता या पदावर करारपध्दतीने नेमणूक करणेबाबत असे स्पष्ट लिहावे.विवित नमुन्यातील अर्ज व अटी कार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग,मेरी,नाशिक यांचे कार्यालयातील सुचना फलकावर प्रत्यक्ष पहावयास मिळतील.

**( प्र. र. मोरे )**
कार्यकारी अभियंता
स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग
मेरी, नाशिक ४२२ ००४

**( गि. म. संघाणी )**
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
नाशिक ४२२ ००४

सत्यमेव जयते
जलसंपदा विभाग

# अधीक्षक अभियंता

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
मेरी इमारत, दिंडोरी रोड, नाशिक -४२२००४
Phone No. : 0253-2531153
Email:semeri.nashikwrd@maharashtra.gov.in, semerinashik@gmail.com
Web : www.merinashik.org

## सविस्तर जाहिरात

**अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,मेरी, नाशिक**
**सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवाकरार पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत जाहिरातीचा सविस्तर तपशील**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५ /प्र. क्र.१००/१३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १७.१२.२०१६. अनुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गातल सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने या कार्यालयामधील विवक्षीत कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी नाशिक येथे जलसंपदा विभागीतील प्रकल्पीय संशोधन,माती व मुरूम चाचणी,संकल्पन,परिसरातील इमारती, निवासस्थानांची देखभाल व दुरूस्ती तसेच स्थापत्य कामाच्या अनुषंगाने विविध तांत्रिक स्वरूपची कामे इ. प्रकारचे कामाचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज कार्यकारी अभियंता, स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग,मेरी, नाशिक दि. १५-११-२०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) प्राप्त होईल याप्रमाणे पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकिटावर "सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे. नियोजित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर सेवाकरार पध्दतीवर नेमणूकांचे आदेश हे योग्य स्तरावर अंतिम मान्यतेनंतर निर्गमीत करण्यात येतील.

**सेवा करार पध्दतीवर भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | पदनाम | जिल्हा | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता | नाशिक | ५ | अंतिम वेतन वजा पेन्शन सुत्राप्रमाणे |
| | पात्रता अनुभव :- बांधकाम कार्यप्रकारातील कामाचा अनुभव असलेले जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त गट - ब अराजपत्रित अधिकारी | | | |

सदर नेमणूकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट https://wrd.maharashtra.gov.in चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,मेरी, नाशिक या कार्यालयात उपलब्ध आहे.

**सदर नेमणुक ही खालील सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधीन राहील.**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाचा विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा जलसंपदा विभागातील कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणुक एक वर्षासाठीच राहील. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवा निवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५ /प्र. क्र.१००/१३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमिक म्हणून त्यांना अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/ संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु. ५००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेखात देण्यात यावा.

५. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक अधिकाऱ्याचे मूळ प्रमाणपत्र द्यावे.

६. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक राहील.

७. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक राहील.

८. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.

१०. अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळेच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. अशा करार पध्दतीवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती, कामाबाबत व आधार सामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१३. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१४. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र/ नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यांत यावे.

१५. अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे कुटुंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१६. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१७. सदर नियुक्ती राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक येथे विवक्षीत कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास सेवा करार पध्दतीने भरावयाची पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार अबाधित राहील.

१८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांस कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

१९. उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन/ नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतिम राहतील.

**( प्र. र. मोरे )**
कार्यकारी अभियंता
स्थापत्य बांधकामे परिरक्षण विभाग
मेरी, नाशिक ४२२ ००४

**( गि. म. संघाणी )**
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
नाशिक ४२२ ००४